गिर्यारोहण क्षेत्रातील सर्वात तरुण जागतिक विक्रमवीर, निमा रिंजी शेर्पा यांनी रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सरस्वती मंदिर ट्रस्ट शाळेला सदिच्छा भेट दिली.

१८ वर्षाच्या या युवकाने, जगातील ८००० मीटर ( २५००० फूट) वरील उंच असलेली जगातील सर्व शिखराना यशस्वी भेट दिलेली आहे. या कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन, ठाण्यातील सरस्वती मंदिर ट्रस्ट, संचलित ,सरस्वती छात्रसेनेने केले होते.

तरुण गिर्यारोहक निमा शेर्पा चे छात्र सैनिकांनी लष्करी इतमामाने स्वागत केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीस, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त ,सुरेंद्र दिघे यांनी आपल्या प्रास्ताविकात, गिर्यारोहण या खेळाचे वैशिष्ट्य आणि महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. गिर्यारोहण हा केवळ खेळ नसून एक जीवन शैली आहे. या खेळात पाय जमिनीवर ठेवून नजर शिखरावर, म्हणजेच आपल्या ध्येयावर केंद्रित करावयाची असते. या खेळात पराभवाचे दुःख नसते, आणि विजयाचा उन्माद नसतो.

गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी, संस्थेच्या क्रीडा संकुलच्या आतील भिंतीवर, ठाणे परिसरातील पहिली प्रस्तरारोहणाची कृत्रिम भिंत बांधण्याचे संस्था नियोजन करीत आहे अशी माहिती दिली.

जेष्ठ गिर्यारोहक आणि व्यवस्थापन तज्ज्ञ प्रा. चारुहास जोशी यांनी निमा शेर्पा यांची मुलाखत घेतली. अतिशय रंगलेल्या या मुलाखतीत, निमा शेर्पा यांनी आपला गिर्यारोहणाचा इतिहास उलगडून दाखवला. कौटुंबिक पार्श्वभूमी पहाडी असल्यामुळे, घरातच गिर्यारोहणाचे प्राथमिक धडे मिळाले. वडील आणि काका, यांचे बोट धरून, त्यांनी पहिले पाऊल पर्वतावर टाकले आणि नंतर नैसर्गिक रीत्या गिर्यारोहण सुरू झाले. शालेय वयात ,शारीरिक आणि मानसिक तयारी सुरू झाली. वयाच्या १५ व्या वर्षी मकालु शिखराला भेट दिली. नंतर एव्हरेस्ट, कांचनगंगा अशा इतर सर्वोच्च शिखरांचे आव्हान स्वीकारले.

अती उंचीवरील उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीची त्यांनी स्व अनुभवासहित आठवणी सांगितल्या.

या कार्यक्रमासाठी पुणे येथील एव्हरेस्टवीरा सहित, मुंबई, ठाणे, डोंबिवली येथील अनेक गिरिप्रेमी उपस्थित होते.

**https://www.facebook.com/share/v/1DpLX2vNKp/**

**https://youtu.be/SkB0TYLf1H0?si=mEnhOjSfi2FKmwd5**

ePaper| Today's News Papers | लोकमत वृत्तपत्रे **https://share.google/tmlD2QpY9zMUuILsG**

https://youtu.be/ta-aeInlGYc?si=z2kc2gh4NzR38ZGO

https://www.ptinews.com/story/national/record-holding-nepalese-climber-nima-sherpa-visits-thane/4003953